RNI No. MAHBIL/2009/36619

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

# असाधारण भाग एक—कोकण विभागीय पुरवणी

वर्ष ६, अंक ३४] सोमवार, नोव्हेंबर २, २०२०/कार्तिक ११, शके १९४२ [पृष्ठे ३, किंमत : रुपये ११.००

## असाधारण क्रमांक ५३

## प्राधिकृत प्रकाशन

**विशेष कार्यकारी अधिकारी यांच्या नेमणूका**

### जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी पालघर यांजकडून

### अधिसूचना

क्रमांक गृह/का.१/टे.४/विकाअ/वशी- १५८७ /२०२०.— जिल्हाधिकारी पालघर, जिल्हा पालघर ह्या निर्णयाद्वारे सोबत जोडलेल्या अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या पालघर जिल्ह्यातील पालघर नगरपरिषद मधील खालील सदस्यांची विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्ती करीत आहे. ही नियुक्ती सामान्यतः आदेश निर्गमित केल्याच्या तारखेपासून ५ वर्षाकरिता अथवा पुढील आदेश होईपर्यंत यापैकी जे आधी घडेल तो पर्यंत अस्तित्वात राहील. तसेच राज्य शासनास/जिल्हाधिकारी, पालघर यांना विशेष कार्यकारी अधिकारी यांची ही नियुक्ती वरील कालावधी पुर्ण होण्यापूर्वी केव्हाही, कोणतेही कारण न देता संपुष्टात आणण्याचा अधिकार राहील.

**१. विशेष कार्यकारी अधिकारी पुढे उल्लेख केलेली कर्तव्ये पार पाडण्यास सक्षम राहतील :—**

(एक) विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून केलेली नियुक्ती " मानसेवी " असल्यामुळे विशेष कार्यकारी अधिकारी यांना कोणतेही मानधन/वेतन/भत्ते अनुज्ञेय असणार नाहीत.

(दोन) विशेष कार्यकारी अधिकारी यांना केवळ कागदपत्रांच्या साक्षांकनाचे अधिकार राहतील व त्यांनी मूळ कागदपत्रे प्रत्यक्ष पाहिल्या शिवाय साक्षांकन करु नये. त्यांनी साक्षांकन करताना विहीत रबरी शिक्क्यासह सही करुन सहीखाली दिनांक नमूद करावा. मूळ कागदपत्रांपेक्षा वेगळी माहिती नमूद असलेल्या कागदपत्रांवर विशेष कार्यकारी अधिकारी यांनी साक्षांकन करु नये. वेगळी माहिती असलेल्या कागदपत्रांवर जर " सत्यप्रत " म्हणून साक्षांकन केल्यास त्यामुळे होणा-या सर्व प्रकारच्या परिणामाकरीता " विशेष कार्यकारी अधिकारी " म्हणून साक्षांकन करणारी व्यक्ती जबाबदार राहील. अशी घटना उघडकीस आल्यास त्या व्यक्तीची विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून करण्यात आलेली नियुक्ती रद्द करण्यात येईल. व तो/ती विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून पुनर्नियुक्तीस अपात्र असेल.

(तीन) विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्त झालेल्या व्यक्तिंनी त्यांच्या घरावर/ दुकानावर/ कार्यालयावर स्वतःच्या नावासह " विशेष कार्यकारी अधिकारी " असा फलक लावावा. तथापि त्यांनी त्यांच्या कुठल्याही वाहनावर " विशेष कार्यकारी अधिकारी " असा उल्लेख करु नये. तसेच त्यांच्या नियुक्तीचा कालावधी संपुष्टात आल्यावर लागलीच त्यांनी सदर फलक काढावेत.

(चार) विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्त झालेल्या व्यक्तींनी " ओळख परेड " तसेच मृत्यूपुर्व " मृत्यूपूर्व जबानी " यासाठी उपस्थित राहू नये.

(पाच) विशेष कार्यकारी अधिकारी यांनी " उत्पन्नाचे प्रमाणपत्र " देऊ नये.

(सहा) नियुक्तीचा कालावधी संपुष्टात आल्यानंतर विशेष कार्यकारी अधिकारी यांनी साक्षांकनाचे काम करु नये व सर्व साहित्य संबंधित तहसिलदार यांचेकडे तात्काळ परत करावे, अन्यथा ते पुनर्नियुक्तीस अपात्र ठरतील. नियुक्ती कालावधी संपुष्टात आल्यानंतर विशेष कार्यकारी अधिकारी यांनी साक्षांकन केल्याचे निष्पन्न झाल्यास त्यांच्या विरुध्द फसवणुकीचा गुन्हा नोंदविण्यात येईल.

(सात) विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्ती ही नियुक्तीच्या दिनांकापासून ५ वर्षे कालावधीसाठी राहील व त्यानंतर ती आपोआप संपुष्टात येईल. सदर नियुक्तीच्या कालावधीत त्यांनी कोणतीही नियमबाह्य कृती केल्यास किंवा त्यांचे विरुध्द गुन्ह्याची नोंद आढळल्यास, त्यांना कोणत्याही न्यायालयाने नादार (bankrupt) जाहीर केले असल्यास, त्याच प्रमाणे कोणत्याही कारणाशिवाय सुध्दा, कोणतीही पूर्वसूचना न देता त्यांची नियुक्ती मुदतपुर्व रद्द करण्यात येईल. :—

**अनुसूची**

| अ. क्र. (१) | व्यक्तीचे नाव (२) | नगरपरिषद/नगरपंचायत (३) |
|---|---|---|
| १ | डॉ. काळे उज्वला केदार | पालघर नगरपरिषद |
| २ | श्री. बाबर दिनेश पांडुरंग | पालघर नगरपरिषद |
| ३ | श्रीम. मेमन शेरबानू मुनाफ | पालघर नगरपरिषद |
| ४ | श्रीम. म्हात्रे प्रियंका राजेंद्र | पालघर नगरपरिषद |
| ५ | श्री. म्हात्रे रविंद्र मधूकर | पालघर नगरपरिषद |
| ६ | श्रीम. मिश्रा मोना मुन्ना | पालघर नगरपरिषद |
| ७ | श्री. भानुशाली तुषार दिलीप | पालघर नगरपरिषद |
| ८ | श्रीम. जाधव कविता सुरेश | पालघर नगरपरिषद |
| ९ | श्री. मोरे प्रविण मधुकर | पालघर नगरपरिषद |
| १० | श्री. घरट दिनेश गोपाळ | पालघर नगरपरिषद |
| ११ | श्रीम. पाटील हिंदवी विरेंद्र | पालघर नगरपरिषद |
| १२ | श्री. म्हात्रे कैलास सुक-या | पालघर नगरपरिषद |
| १३ | श्रीम. हजारी लक्ष्मीदेवी धनराजसिंह | पालघर नगरपरिषद |
| १४ | श्री. पाटील राजेंद्र आत्माराम | पालघर नगरपरिषद |
| १५ | श्रीम. राजपूत अलका पोपटसिंह | पालघर नगरपरिषद |
| १६ | श्री. वडे चंद्रशेखर गोपीनाथ | पालघर नगरपरिषद |
| १७ | श्रीम. बाजपेई शिल्पा अमर | पालघर नगरपरिषद |
| १८ | श्रीम. तरे अनुजा अशोक | पालघर नगरपरिषद |
| १९ | श्री. पिंपळे प्रथमेश उत्तम | पालघर नगरपरिषद |
| २० | श्रीम. पिंपळे गीता सुचित | पालघर नगरपरिषद |
| २१ | श्री. संखे अक्षय किशोर | पालघर नगरपरिषद |
| २२ | श्रीम. गायकवाड चेतना हेमंत | पालघर नगरपरिषद |
| २३ | श्री. संखे भावानंद शांताराम | पालघर नगरपरिषद |

**अनुसूची—**समाप्त.

| (१) | (२) | (३) |
|---|---|---|
| २४ | श्रीम. मानकामे राधा अरविंद | पालघर नगरपरिषद |
| २५ | श्री. पाटील सुभाष विष्णू | पालघर नगरपरिषद |
| २६ | श्रीम. किणी अनिता शशिकांत | पालघर नगरपरिषद |
| २७ | श्री. घरत उत्तम मोरेश्वर | पालघर नगरपरिषद |
| २८ | श्रीम. अंबुरे राहिणी अशोक | पालघर नगरपरिषद |
| २९ | श्री. माने अरूण अनंत | पालघर नगरपरिषद |

पालघर,
दिनांक २९ ऑक्टोबर २०२०.

**डॉ. माणिक गुरसळ,**
जिल्हाधिकारी, पालघर.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 EDITOR : DIRECTOR RUPENDRA DINESH MORE.